नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - ३४७ | Issue - 347 | वार मंगळवार दि. ६ मे २०२५ | Blow- Tuesday Date 6 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## केंद्रीय गृहमंत्रालयाचे सर्व राज्यांना मॉक ड्रीलचे आदेश

### ७ मे ला सुरक्षा यंत्रणांचे मॉक ड्रील; विद्यार्थी आणि नागरिकांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथील हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान तणाव वाढला आहे. पाकिस्तानकडून वारंवार भारताला युद्धाची धमकी देण्यात येत आहे. तसेच पाकिस्तानमध्ये युद्धजन्य परिस्थिती असल्यासारखी तयारी केली जात आहे. दोन्ही देशांमधील तणाव हा दिवसेंदिवस वाढत जाताना दिसतोय. त्यामुळे मोदी सरकार देखील सतर्क झालं आहे. खरंतर युद्ध हे दोन्ही देशांना परवडणारं नाही. कारण युद्धात दोन्ही देशांचं मोठं नुकसान होऊ शकतं. या युद्धात भारताचा शंभर टक्के विजय होईल. पण या युद्धाच्या हानीचा देखील विचार केला पाहिजे. असं असलं तरीही पाकिस्तानकडून सातत्याने दहशतवादी कारवाया करुन भारतीय नागरीक, लष्कराचे जवान यांना टार्गेट केलं जात आहे.

पहलगाम येथील हल्ल्याने तर टोक गाठलं आहे. विशेष म्हणजे या हल्ल्यानंतर पाकिस्तानच्या मंत्र्यांकडून सातत्याने गरळ ओकण्याचं काम सुरु आहे. पाकिस्तानकडून आगीत तेल ओतलं जात आहे. पाकिस्तानकडून सीमाभागात दररोज रात्री शस्त्रसंधीचं उल्लंघन केलं जात आहे. पाकिस्तानी सैन्याकडून सीमेवर भारताच्या दिशेला बेछुट गोळीबार सुरु आहे. या घडामोडी एकीकडे घडत असताना दिवसभरात ५ मोठ्या घडामोडी घडल्या आहेत.



भारतात केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यांना महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. केंद्रीय गृहमंत्रालयाने सर्व राज्यांना नागरी सुरक्षेसाठी येत्या ७ मे ला सुरक्षा यंत्रणांचे मॉक ड्रील घेण्याचे आदेश दिले आहेत. हवाई हल्ला झाल्यास सायरन कसा वाजवला जातो तसा सायरन वाजवा, असेही निर्देश गृह मंत्रालयाकडून देण्यात आले आहेत. तसेच युद्धजन्य परिस्थिती उद्भवल्यास स्वत:चा बचाव कसा करावा याबाबत विद्यार्थी आणि नागरिकांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण द्या, असे निर्देश देखील केंद्रीय गृह मंत्रालयाकडून देण्यात आले आहेत. यामुळे आगामी काळात भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण होणार का? याबाबत धाकधूक वाढली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सुरक्षा सुरक्षा सचिव आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासोबत बैठक घेतली. या बैठकीत सुरक्षे संदर्भात अतिशय महत्त्वाची चर्चा झाल्याची माहिती आहे. एकीकडे या घडामोडी सुरु असताना भारताचा पारंपरिक मित्रराष्ट्र असणाऱ्या रशियाने दहशतवाद विरोधाच्या लढाईत आपण भारत सोबत असल्याचं स्पष्ट केलं आहे. यासाठी रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन करुन आपला पाठिंबा असल्याचं म्हटलं आहे. तसेच त्यांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला आहे. त्यामुळे ही मोठी घडामोड मानली जात आहे. रशियाने १९७१ च्या युद्धावेळी देखील भारताला पाठिंबा दिला होता. दुसरीकडे पाकिस्तानने संयुक्त राष्ट्र संघात धाव घेतली आहे. पहलाग हल्ल्याबाबत चर्चेची मागणी त्यांनी केली आहे. या घटनेचा नि:पक्ष तपास व्हावा, असं पाकिस्तानने म्हटलं आहे. यानंतर आता संयुक्त राष्ट्र संघ याबाबत बैठक घेणार असल्याची माहिती आहे.

भारत-पाकिस्तान तणाव वाढला असताना वरिष्ठ पातळीवर मोठ्या घडामोडी घडल्या. भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची जपानचे संरक्षण मंत्री जनरल नकातानी यांच्यासोबत बैठक पार पडली. या बैठकीत पहलगाम हल्ला आणि सध्या सुरु असलेल्या घडामोडींबाबत चर्चा झाली. या बैठकीत जपानने भारताला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे राजनाथ सिंह यांनी जपानचे आभार मानले आहेत. दोन्ही देशांमध्ये संरक्षण सहयोग वाढवण्याबाबत चर्चा झाल्याची माहिती आहे.

## वक्फ सुधारणा कायद्याबाबत सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचे महत्त्वाचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : वक्फ मंडळ सुधारणा कायद्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या आव्हान याचिकांवर आता न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर पुढच्या गुरुवारी (१५ मे) सुनावणी केली जाईल, असे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी सोमवारच्या सुनावणी दरम्यान नमूद केले. न्यायमूर्ती गवई १४ मे रोजी भारताच्या पुढील सरन्यायाधीशपदाची शपथ घेणार असल्याने वक्फ प्रकरणाची सुनावणी नव्या सरन्यायाधीशांसमोरच होणार हे स्पष्ट झाले आहे. याआधीच्या सुनावणीत न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्या खंडपीठाने वक्फ कायद्यातील काही तरतुदींबाबत चिंता व्यक्त केल्यानंतर, केंद्र सरकारने या वादग्रस्त तरतुदी स्थगित करण्याचा निर्णय घेतला होता. सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजयकुमार आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर आज याबाबत थोडा वेळ सुनावणी पार पडली. राज्यघटनेच्या कलम २५, २६, २९ आणि ३० अंतर्गत वक्फ सुधारणा कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे. अशा परिस्थितीत सरकार कायदा करून या प्रकरणात हस्तक्षेप करू शकत नाही, असा युक्तिवाद करून वक्फ कायद्याविरुद्ध अनेक स्वयंसेवी संस्था, मुस्लिम संघटना आणि काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने याआधीच, फक्त निवडक याचिकांवरच सुनावणी होईल असे स्पष्ट केले होते. भारताच्या सरन्यायाधीशांच्या निवृत्तीचे वय ६५ असल्याने न्यायमूर्ती संजीव खन्ना आणखी ७ कामकाजी दिवसांनी निवृत्त होणार आहेत. न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी आजच्या सुनावणीत सांगितले की, वक्फ याचिका न्यायमूर्ती गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर सूचीबद्ध केल्या जातील. कारण त्यांच्या निवृत्तीला काही दिवसच शिल्लक आहेत. पुढील आदेश येईपर्यंत न्यायालयाने या कायद्याबद्दल सध्याची परिस्थिती जैसे थे ठेवण्यास सांगितले आहे. याचिकाकर्त्यांना फक्त ५ याचिका सादर करण्यासही सांगण्यात आले आहे. याशिवाय, पुढील सुनावणीपर्यंत वक्फ मंडळात पुनर्नियुक्ती होणार नाही. न्यायमूर्ती खन्ना म्हणाले की, आपण केंद्राचे आणि याचिकाकर्त्यांचे प्रति-प्रतिज्ञापत्र तपशीलवार पाहिलेले नाही. या अंतरिम टप्प्यावर आपल्याला कोणताही निर्णय/आदेश राखून ठेवायचा नाही. या प्रकरणाची लवकर सुनावणी होणे आवश्यक आहे. यावरही आपण सहमत आहोत. त्यामुळे हे प्रकरण न्यायमूर्ती गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर सूचीबद्ध करण्यात येत आहे. या प्रकरणाची सुनावणी योग्य वेळी करावी लागेल आणि ती माझ्यासमोर असणार नाही. याचिकाकर्त्यांकडून बाजू मांडणारे वरिष्ठ वकील कपिल सिब्बल आणि वरिष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी तसेच सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरन्यायाधीशांची सूचना मान्य केली. न्यायालयाने १६ आणि १७ एप्रिल रोजी दोनदा वक्फ कायदा प्रकरणाची सविस्तर सुनावणी केली आहे. १६ एप्रिल रोजी सिब्बल यांनी युक्तिवाद करताना वक्फ कायद्याबद्दल विविध चिंता व्यक्त केल्या, ज्यामध्ये 'वापरकर्त्याद्वारे वक्फ' तरतूद वगळण्यात आली आहे.

## बारावीचा निकाल जाहीर, राज्याचा ९१.८८ टक्के निकाल; पुन्हा एकदा मुलीच सरस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : यंदाच्या १२ वीच्या परीक्षेत ७ लाख ५६ हजार २२६ मुले बसली होती. त्यापैकी ६ लाख ७६ हजार ९७२ म्हणजे ८९.५१ टक्के मुले उत्तीर्ण झाली. तर परीक्षा देणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या ६ लाख ६१ हजार ७४३ होती. त्यापैकी ९४.५८ टक्के विद्यार्थिनी यशस्वी झाल्या. मुलांच्या आणि मुलींच्या उत्तीर्ण होण्याच्या प्रमाणात तब्बल ५ टक्क्यांची तफावत असल्याने त्याचा परिणाम एकूण सरासरीवर झाला. विभाग-टक्केवारी



कोकण- ९६.७४ कोल्हापूर- ९३.६४ मुंबई- ९२.९३ छत्रपती संभाजीनगर- ९२.२४ अमरावती- ९१.४३ पुणे- ९१.३२ नाशिक- ९१.३१ नागपूर- ९०.६२ लातूर- ८९.४६ १२:३१ झच्, चरू ०५ २०२५

मुलींनी नेहमीप्रमाणेच मुलांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे. बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार, एकूण १५४ विषयांपैकी ३७ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. याचा अर्थ या विषयांमध्ये परीक्षा देणारे सर्व विद्यार्थी पास झाले आहेत. तसेच, १९२९ कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी निकालाची टक्केवारी घटली आहे. गेल्या वर्षी बारावीचा निकाल ९३.३७ टक्के होता. यावर्षी तो ९१.८८ टक्क्यांवर आला आहे.


## मराठवाड्यात गारपिट; तिघांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर: मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर आणि परभणी जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारपीट आणि पाऊस झाल्यामुळे फळबागा आणि शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. तर अंगावर वीज कोसळल्यामुळे तिघांचा मृत्यू झाला. पुढील दोन दिवस हलक्या ते मध्यम स्वरुपात पाऊस होईल, असा अंदाज जिल्हा कृषी हवामान केंद्राने व्यक्त केला आहे.

मराठवाड्याच्या काही भागाला सोमवारी अवकाळी पावसाने झोडपले. दुपारी वादळासह गारपीट आणि पाऊस झाला. पावसामुळे भाजीपाला, फळबागा आणि शेतमालाचे मोठे नुकसान झाले आहे. महसूल प्रशासनाने जिल्हानिहाय नुकसानीचा प्राथमिक माहिती अहवाल जाहीर केला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कोडापूर (ता. गंगापूर) येथे शेतवस्तीवर राहणारे अशोक नंदू म्हस्के (वय २२) या तरुण शेतकऱ्याचा अंगावर वीज कोसळून मृत्यू झाला. बीड जिल्ह्यातील मगरवाडी (ता. अंबाजोगाई) येथील सचिन मधुकरराव मगर (वय ३५) यांचा अवकाळी पावसात शेतात वीज पडून मृत्यू झाला. ढोरवाडी (ता. वडवणी) येथील अभिमन्यू पांडुरंग नलभे (वय ३६) यांचा सायंकाळी वीज पडून मृत्यू झाला. जालना जिल्ह्यातील परतूर येथील शेख मुख्तार शेख अख्तर कुरेशी यांचा एक बैल वीज पडून दगावला असल्याचे तहसील कार्यालयाने सांगितले. परभणी जिल्ह्यातील कोरवाडी (ता. जिंतूर) येथील समाधान सुदाम कोंडाळ यांच्या शेतातील गोठ्यावर वीज पडून गाय आणि वासराचा जळून जागीच मृत्यू झाला.

छत्रपती संभाजीनगर तालुक्यासह जिल्ह्यातील सिल्लोड, खुलताबाद, फुलंब्री, पैठण तालुक्यातील अनेक गावात जोरदार पाऊस झाला आहे. खुलताबाद तालुक्यात वादळामुळे लग्न सोहळ्यात धांदल उडाली. काही ठिकाणी वाऱ्यामुळे मांडव पडल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. वैजापूर तालुक्यातील शिऊर, परसोडा भागात पाऊस झाला आहे. ढगाळ वातावरणामुळे शेतकऱ्यांची कांदे झाकण्यासाठी धावपळ उडाली होती. पैठण तालुक्यातील बिडकीन, चितेगाव, वडजी परिसरात अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली. गंगापूर तालुक्यातील लासूर बाजार समितीत अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. तिथे पावसामुळे धान्याची पोती भिजली आहेत. वाळूज-पंढरपूर भागात गारपीट आणि पावसामुळे नागरिकांची धावपळ उडाली. या भागात मोठ्या आकाराच्या गारा पडल्या आहेत. शेकटा परिसरात वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला आहे. जालना जिल्ह्यातील बदनापूर, रोहिलागड



परिसरात मोठा पाऊस झाला आहे.

दरम्यान, लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यात जोरदार पाऊस झाला. लातूर शहरात सायंकाळी विजेच्या कडकडाटासह पाऊस झाला. रेणापूर शहरात वीजपुरवठा खंडीत झाला होता. केज तालुक्यात चिंचोली माळी, हदगाव, डोका, सारुकवाडी परिसरात गारांसह अवकाळी पाऊस पडला आहे.

### पहलमाग हल्ल्यात पाकिस्तानची असलेली भूमिका, त्यांचा सहभाग भारत आंतरराष्ट्रीय पातळीवर उघड करणार

### सीमेपलीकडील दहशतवादावर चर्चा सुरू करणे हा भारताचा उद्देश

## १५ पैकी १३ देश भारताच्या बाजूने; पाकिस्तानविरोधात मोठी फिल्डींग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: पहलगाम हल्ल्यामुळे भारत पाकिस्तानला घेरण्याची तयारी करत आहे. यासाठी भारत संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत (UNSC) एक महत्त्वाचे पाऊल उचलणार आहे. पहलगाम हल्ल्यात २६ नागरिक मारले गेले. भारत या हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग जगासमोर आणणार आहे. णछडउमध्ये भारताला १५ पैकी १३ देशांचा पाठिंबा आहे. पण चीन आणि पाकिस्तान यात सामील नाहीत. पहलमाग हल्ल्यात पाकिस्तानची असलेली भूमिका, त्यांचा सहभाग भारत आंतरराष्ट्रीय पातळीवर उघड करणार आहे.

पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला चहूबाजूंनी घेरण्याची तयारी सुरू केली आहे. यासाठी भारत प्रत्येक राजनैतिक पाऊल उचलत आहे. भारत आता णछडउ मध्ये एक मोठे पाऊल उचलणार आहे. सीमेपलीकडील दहशतवादावर चर्चा सुरू करणे हा भारताचा उद्देश आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये सक्रिय असलेल्या आणि पाकिस्तानमधून चालणाऱ्या दहशतवादी संघटनांवर भारताचे लक्ष आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिक मारले गेले. या हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग आंतरराष्ट्रीय स्तरावर उघडकीस आणण्याचा भारताचा प्रयत्न आहे.

पाकिस्तान सीमेपलीकडून दहशतवादाला प्रोत्साहन देत आहे, हे वारंवार समोर आले आहे. भारताने हा मुद्दा अनेक देशांसमोर मांडला आहे. णछडउ मध्ये सीमेपलीकडील दहशतवादावर चर्चा सुरू करण्यासाठी भारताने १५ पैकी १३ सदस्य देशांचे समर्थन मिळवले आहे. या देशांमध्ये चीन आणि पाकिस्तानचा समावेश नाही. भारत हा मुद्दा दोन देशांमधील राजकीय वाद न मानता, आंतरराष्ट्रीय दहशतवादी धोका म्हणून सादर करेल. लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मद यांसारख्या दहशतवादी संघटनांना पाकिस्तानची सेना आणि गुप्तचर संस्था मदत करतात, यावर भारताचा भर असेल.





जर UNSC मध्ये या मुद्यावर चर्चा झाली, तर सीमेपलीकडून होणाऱ्या हल्ल्यांची वाढती संख्या जगासमोर आणली जाईल. पहलगाम हल्ल्याची जबाबदारी सुरुवातीला 'द रेझिस्टन्स फ्रंट' नावाच्या ढशढ च्या संघटनेने घेतली होती. पण नंतर त्यांनी यातून माघार घेतली. भारतीय गुप्तचर संस्थेने या हल्ल्याचे धागेदोरे नियंत्रण रेषेच्या पलीकडे असल्याचे सांगितले आहे.

दरम्यान, पाकिस्तान UNSC मध्ये आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न करत आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, इस्लामाबाद परिषदेला भारताच्या आक्रमक कारवाया, वारंवार चिथावणीखोर विधाने आणि भडकाऊ वक्तव्यांबद्दल माहिती देईल. पाकिस्तानचे म्हणणे आहे की, यामुळे प्रादेशिक आणि जागतिक शांतता आणि स्थिरतेला धोका आहे.

पाकिस्तान UNSCमध्ये भारताने सिंधू जल समझोता (सिंधू नदी पाणी वाटप करार) निलंबित करण्याचा मुद्दा उपस्थित करण्याची तयारी करत आहे. पाकिस्तान याला बेकायदेशीर, एकतर्फी प्रयत्न आणि आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्यांचे उल्लंघन म्हणत आहे. इस्लामाबाद UNSCला त्यांची प्राथमिक जबाबदारी पार पाडण्याची आणि हे मुद्दे सोडवण्यासाठी पाऊल उचलण्याची विनंती करत आहे.

भारताची ही रणनीती २०२१-२०२२ दरम्यान UNSC मध्ये अस्थायी सदस्य म्हणून असलेल्या त्याच्या कार्यकाळावर आधारित आहे. त्या वेळी भारताने दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी जागतिक स्तरावर सहमतीची गरज आहे, यावर जोर दिला होता. UNSCच्या औपचारिक चर्चेत पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद आणण्याचा हा प्रयत्न त्याच दिशेने उचललेले पाऊल आहे.

१५ पैकी १३ UNSC सदस्यांचे समर्थन मिळवून भारत केवळ पाकिस्तानला एकाकी पाडत नाही, तर परिषदेत स्थायी जागेसाठी आपली दावेदारीही मजबूत करत आहे. त्यातून आंतरराष्ट्रीय पातळीवरील भारताचा वाढता स्पष्ट होत आहे.

## संपादकीय....

# राज्यांना निर्देश

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथील हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान तणाव वाढला आहे. पाकिस्तानकडून वारंवार भारताला युद्धाची धमकी देण्यात येत आहे. तसेच पाकिस्तानमध्ये युद्धजन्य परिस्थिती असल्यासारखी तयारी केली जात आहे. दोन्ही देशांमधील तणाव हा दिवसेंदिवस वाढत जाताना दिसतोय. त्यामुळे मोदी सरकार देखील सतर्क झालं आहे. खरंतर युद्ध हे दोन्ही देशांना परवडणारं नाही. कारण युद्धात दोन्ही देशांचं मोठं नुकसान होऊ शकतं. या युद्धात भारताचा शंभर टक्के विजय होईल. पण या युद्धाच्या हानीचा देखील विचार केला पाहिजे. असं असलं तरीही पाकिस्तानकडून सातत्याने दहशतवादी कारवाया करुन भारतीय नागरीक, लष्कराचे जवान यांना टार्गेट केलं जात आहे. पहलगाम येथील हल्ल्याने तर टोक गाठलं आहे. विशेष म्हणजे या हल्ल्यानंतर पाकिस्तानच्या मंत्र्यांकडून सातत्याने गरळ ओकण्याचं काम सुरु आहे. पाकिस्तानकडून आगीत तेल ओतलं जात आहे. पाकिस्तानकडून सीमाभागात दररोज रात्री शस्त्रसंधीचं उल्लंघन केलं जात आहे. पाकिस्तानी सैन्याकडून सीमेवर भारताच्या दिशेला बेछुट गोळीबार सुरु आहे. या घडामोडी एकीकडे घडत असताना दिवसभरात ५ मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. भारतात केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यांना महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. केंद्रीय गृहमंत्रालयाने सर्व राज्यांना नागरी सुरक्षेसाठी येत्या ७ मे ला सुरक्षा यंत्रणांचे मॉक ड्रील घेण्याचे आदेश दिले आहेत. हवाई हल्ला झाल्यास सायरन कसा वाजवला जातो तसा सायरन वाजवा, असेही निर्देश गृह मंत्रालयाकडून देण्यात आले आहेत. तसेच युद्धजन्य परिस्थिती उद्भवल्यास स्वतःचा बचाव कसा करावा याबाबत विद्यार्थी आणि नागरिकांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण द्या, असे निर्देश देखील केंद्रीय गृह मंत्रालयाकडून देण्यात आले आहेत. यामुळे आगामी काळात भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण होणार का? याबाबत धाकधूक वाढली आहे.

# भटक्या जाती व विमुक्त जमातीतील नागरिकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आण्याकरीता प्रयत्नशील : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ देत भटक्या जाती व विमुक्त जमातीतील नागरिकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे, आगामी काळात या समाजाच्या कल्याणासोबतच त्यांना न्याय मिळवून देण्याकरीता राज्यशासन समर्पित भावनेने काम करेल, अशी ग्वाही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. राज्य शासनाच्या १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेअंतर्गत महसूल विभाग व भटके विमुक्त विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने फर्ग्युसन महाविद्यालय येथे आयोजित विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील नागरिकांना दाखले वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, सामाजिक न्याय राज्य मंत्री माधुरी मिसाळ, आमदार विजय शिवतारे, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उपविभागीय अधिकारी यशवंत माने, हवेलीचे तहसीलदार किरण सूर्यवंशी, भटके विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष उद्धव काळे, कार्याध्यक्ष डॉ. संजय पुरी आदी उपस्थित होते. मंत्री बावनकुळे म्हणाले, राज्यशासनाच्या वतीने भटक्या जाती व विमुक्त जमातीच्या कल्याणासाठी लोकाभिमुख निर्णय घेऊन त्यांच्याकरीता विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ देऊन नागरिकांच्या जीवनात बदल घडवून आणण्याकरीता प्रशासनाने काम करावे. आजही या जाती-जमातीतील नागरिक समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहे, त्यामुळे येत्या दोन वर्षात भटक्या जाती व विमुक्त जमातीतील एकही नागरिक समाजाच्या मुख्य प्रवाहाच्याबाहेर राहणार नाही, त्यांच्या न्याय व हक्काचे उल्लंघन तसेच त्यांच्यावर अन्याय होणार नाही, यादृष्टीने समाजाच्या शेवटच्या व्यक्तीच्या कल्याणासाठी प्रशासनाने काम करावे.



पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरकुलासाठी गायरान जमिनी उपलब्ध करुन दिल्या आहेत, हे काम राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयापुढे एक प्रारूप म्हणून पुढे आणावे, याप्रमाणे राज्यातील इतर जिल्हाधिकाऱ्यांनीही जमिनी उपलब्ध करुन द्याव्यात. राज्यातील घरकूल लाभार्थ्यांसाठी ५ ब्रास पर्यंत मोफत वाळू उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे. शिक्षणाकरिता महसूल विभागाकडून जी प्रमाणपत्र लागतील त्याकरिता लागणारे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना अर्ज केल्यापासून ४८ तासात दाखले उपलब्ध करुन द्यावेत. 'श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' अभियानाअंतर्गत महसूल प्रशासनाने प्रत्येक महसुली मंडळात वर्षातून चार शिबिराचे आयोजन करुन लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्याचे काम करावे. याबाबत केलेली कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावी. याकामी हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'विकसित भारत' तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'विकसित महाराष्ट्र' निर्माण करण्याचा संकल्प केला आहे, याकरिता सर्वांनी मिळून काम करायचे आहे. नागरिकांच्या कल्याणकरीता प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांनी सातत्याने नवनवीन संकल्पना राबविण्यावर भर द्यावा तसेच त्याची पारदर्शी पद्धतीने अंमलबजावणी करावी. प्रभावीपणे काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या राज्यशासन पाठीशी भक्कमपणे उभे राहील. केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतला असून या निर्णयामुळे सामाजिक व आर्थिक समतोल साधण्यास मदत होणार आहे.

जिल्हाधिकारी डूडी म्हणाले, मुख्यमंत्री यांनी १०० दिवस कार्यालयातील सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत महसूल विभागाने भटके विमुक्त विकास परिषदेच्यामदतीने जिल्ह्यातील भटक्या जाती व विमुक्त जातीच्या ३ हजार ९६२ नागरिकांना जातीचे दाखले उपलब्ध करुन दिले आहेत. जिल्ह्यात सुमारे १८ हजार कातकरी समाजाचे नागरिक राहत असून त्यापैकी १५ हजार नागरिकांना जातीचे दाखले, १६ हजार आधार कार्ड व आयुष्यमान कार्ड, ७०० कुटबांना पीएम सन्मान निधीचा लाभ, तसेच त्यांच्या निवासस्थानाजवळ असलेल्या शासकीय गायरान जमिनीतून ७५० कुटुंबाना जमीन उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच नागरिकांच्या अंगी असलेल्या कौशल्याच्याआधारे प्रशिक्षण दिले जाणार आहे. आगामी काळात केंद्र व राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्याकरीता जातीचे दाखले, आधारकार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, शिधापत्रिका आदी कागदपत्रे नागरिकांना उपलब्ध करुन देण्याकरीता प्रयत्नशील आहे. त्यामुळे आगामी काळातही भटके विमुक्त विकास परिषदेने असेच सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डुडी यांनी केले. काळे म्हणाले, भटक्या जाती व विमुक्त जमातीच्या मुलांना शाळेच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी 'पालावरची शाळा' उपक्रम सुरु करून शिक्षणाची व्यवस्था केली आहे. शासकीय योजनेचे लाभ मिळण्याकरिता लागणारे दाखले उपलब्ध करुन देण्यासाठी परिषद प्रयत्नशील आहे, याकरिता शासनाचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. भटक्या विमुक्त जातीतील नागरिकांना दाखले उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यात सर्वंकष मोहीम राबवावी, अशी सूचना काळे यांनी केली. यावेळी डॉ. पुरी यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमात जिल्ह्यातील भटक्या जाती व विमुक्त जमातीच्या १ हजार ७० नागरिकांना जातीच्या दाखल्याचे वितरण करण्यात आले. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहायक संचालक कांचन जगताप यांनी विभागाच्या विविध योजनांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

# राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई सुडे यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि सुधाकर रणदिवे, राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी लातूर येथील ओबीसी चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्या,बाभळगाव शाळेच्या मुख्याध्यापिका, महिला संघटक श्रीमती रेखाताई सुडे यांची राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे संस्थापक मार्गदर्शक आमदार बाळाराम पाटील, कायदेशीर सल्लागार ड, किल्लारीकर साहेब, प्रदेशाध्यक्ष श्री अनिल सर,राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने, प्रदेश उपाध्यक्ष श्री सुखदेव भालेकर, कार्याध्यक्ष रमेश चव्हाण यांच्या समन्वयातून निवड करण्यात आली. याबद्दल श्रीमती रेखाताई सुडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हिंगोली जिल्हाध्यक्ष श्री लहू राक्षे यांचाही सत्कार करून दोघांनाही पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ ही नोंदणीकृत संघटना असून शिक्षकांचे विविध प्रश्न,समस्या जाणून घेऊन शासन दरबारी त्यावर उपाययोजनासाठी प्रश्न घेऊन लढण्यासाठी दोघांनीही प्रयत्न करणार असल्याचे यावेळी सांगितले.

# निवडणूक आयोग लवकरच एकल बिंदू ॲप सुरू करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारत निवडणूक आयोग नागरिक, निवडणूक अधिकाऱ्यांसह राजकीय पक्ष अशा संबंधित घटकांसाठी एक नवीन, वापरकर्ता अनुकूल डिजिटल इंटरफेस विकसित करत आहे. हे नवीन 'एउखछएढ' नावाचे एकाच ठिकाणी सेवा देणारे व्यासपीठ आयोगाच्या ४० हून अधिक विद्यमान मोबाईल आणि वेब ॲप्लिकेशन्सचे एकत्रीकरण व पुनर्रचना करणारे प असेल असे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

एउखछएढ मध्ये आकर्षक युजर इंटरफेस (णख) आणि सोपी युजर एक्सपीरियन्स (णद) असेल, जे सर्व निवडणूक संबंधित सेवांसाठी एकच व्यासपीठ पुरवेल. अनेक ॲप डाऊनलोड करणे, वेगवेगळे लॉगिन लक्षात ठेवणे यांचा त्रास यामुळे कमी होईल. हा उपक्रम मार्च २०२५ मध्ये झालेल्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या परिषदेत भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या संकल्पनेतून साकार झाला. यावेळी निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी उपस्थित होते.

एउखछएढ वापरकर्त्यांना त्यांचे डेस्कटॉप किंवा स्मार्टफोनवरून संबंधित निवडणूक माहिती पाहण्याची सुविधा देईल. ही माहिती अधिक अचूक राहण्यासाठी केवळ अधिकृत निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांद्वारेच ती प्रविष्ट केली जाईल. अधिकाऱ्यांकडून माहिती प्रविष्ट केल्यामुळे ती विश्वसनीय राहील. मात्र, कोणताही वाद निर्माण झाल्यास, अधिकृत फॉर्ममध्ये भरलेली प्राथमिक माहिती ग्राह्य धरली जाईल.

एउखछएढ मध्ये मतदार सहाय्य ॲप, मतदान टक्केवारी ॲप, उतखत्रखड, सुविधा २.०, एडचड, सक्षम आणि घधउ ॲप यांचा समावेश असेल, जे मिळून आतापर्यंत ५.५ कोटींहून अधिक वेळा डाउनलोड झाले आहेत. एउखछएढ मुळे जवळपास १०० कोटी मतदार व निवडणूक यंत्रणेतील सुमारे १०.५ लाख बूथ स्तर अधिकारी (इडजी), सुमारे १५ लाख राजकीय पक्षांचे बूथ स्तर प्रतिनिधी (इडी), ४५ लाख मतदान कर्मचारी, १५,५९७ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (एठजी), ४,१२३ मतदार नोंदणी अधिकारी (एठजी) आणि ७६७ जिल्हा निवडणूक अधिकारी (ऊएजी) यांना फायदा होणार आहे.

**सुधारित युजर इंटरफेस व युजर एक्स्पीरियन्स सोबत ४० हून अधिक आयटी ॲप समाविष्ट करण्यात येणार**

एउखछएढ ची निर्मिती अंतिम टप्प्यात आहे आणि सुलभ वापर, सुरळीत कार्यक्षमता व मजबूत सायबर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून कठोर चाचण्या घेतल्या जात आहेत. हे व्यासपीठ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांतील ३६ मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करून, त्यांच्यातील ७६७ जिल्हा निवडणूक अधिकारी व ४,१२३ मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या अभिप्रायानंतर आणि निवडणूक आयोगाच्या वेळोवेळी प्रसिद्ध ७६ प्रकाशनांतील ९,००० पानांची तपासणी करून विकसित करण्यात येत आहे.

एउखछएढ द्वारे पुरवण्यात येणारा डेटा लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० व १९५१, मतदार नोंदणी अधिनियम १९६०, निवडणूक संचालन नियम १९६१ व भारत निवडणूक आयोगाच्या वेळोवेळी दिलेल्या सूचनांच्या कायदेशीर चौकटीतच राहील, अशी माहिती भारत निवडणूक आयोगाने दिली आहे.

## संत परंपरेमुळे महाराष्ट्राला मोठा वारसा

## श्री घाळेप्पा स्वामी महाराज यांची १४९ वी पुण्यतीथी साजरी

# अतनुर येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. म्हणून या भूमीला खर्या अर्थाने संत परंपरेच अनुष्ठान लाभलं आहे. संत परंपरेमुळे महाराष्ट्राला मोठा वारसा लाभला आहे. याच माध्यमातून हा वारकरी संप्रदाय खर्या अर्थाने संपूर्ण जगभरात पोहोचायला मदत झाली. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत तुकाराम, संत नामदेव, संत निवृत्तीनाथ, संत मुक्ताबाई, संत सावता माळी, संत सोपानदेव यांच्यासोबतच अनेक संतांनी आपल्या अभंगातून, निरुपणातून समाजाला एक सकारात्मक दिशा देण्याच काम केलं. अतनुर येथे श्री संजीवन समाधी असलेले घाळेप्पा स्वामी महाराज यांच्या नांवाने हा अखंड हरिनाम सप्ताह असतो. संजीवन समाधी म्हणजे एका व्यक्तीने स्वतःच्या इच्छेने, खोल ध्यान अवस्थेत प्रवेश करून, आपल्या शारीरिक देहाचा त्याग करणे. याला अनेकदा 'जिवंत समाधी' देखील म्हटले जाते, कारण व्यक्ती जिवंत असतानाच या अवस्थेत प्रवेश करतो. संजीवन समाधी घेणाऱ्या व्यक्तीचा आत्मा आणि शरीर हे एका विशिष्ट स्थितीत प्रवेश करतात, जिथे ते पूर्णपणे विलीन होतात.

संजीवन समाधी घेतलेले श्री घाळेप्पा स्वामी महाराज यांची १४९ वी पुण्यतीथी साजरी करण्यात आली. ज्या घाळेप्पा स्वामी महाराज जिवंत समाधी घेतल्यानंतर पुर्ण एक वर्षानंतर समाधी काढण्यात आली तेव्हा त्यांचा डावा डोळा ऊघडा होता. तसेच समाधी घेते वेळी लावलेला दिवा एक वर्षानंतही तेवत होता. यावरुन संजिवन समाधिस्थ श्री घाळेप्पा स्वामी महाराजांचे देवत्व सिध्द होते. यामळेच अतनूर पंचक्रोशी मधे श्री घाळेप्पा स्वामी महाराजाचे संतत्व आहे. महाराज नवसाला पावणारे,संकट समयी भक्ताला मदत करणारे अशी गाढ श्रद्धा आहे. महाराजाचा पुजनीय वार सोमवार आहे.श्रावण महिन्यात श्री घाळैप्पा स्वामी महाराज फक्त बेलपत्री खाऊनच अनुष्ठाण करत असत म्हणुनच की काय महाराजाना दुध साखरेचा नैवेद किंवा दुधातील दशमीचा नैवेद दाखवला जातो.

वारकरी संप्रदायामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाला मोठे महत्त्व आहे. यामध्ये सात दिवस विविध प्रकारचे संत वाङमयाचा अभ्यास करणाऱ्या हरिभक्त परायण महाराजांकडून संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकाराम पर्यंत विविध संतांच्या रचना असलेल्या अभंगावर तत्वचिंतन मांडण्यात येते. ज्याद्वारे मनुष्य जन्मात ईश्वर नामाचे विशद केले जाते.

वैशाख प्रतिपदा १ ते वैशाख शुद्ध सप्तमी पर्यत अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप सोमवारी नवनाथ महाराज डोंगरशैळकीकर महाराजाच्या काल्याच्या किर्तनाने करण्यात आला.

जळकोट तालुक्यातील अतनुर येथे अखंड हरिनाम सप्ताहाची

सांगता हजारो जनसागराच्या



साक्षीने भक्तिमय वातावरणात झाली. अतनुर येथे अखंड हरिनाम सप्ताह भक्तिमय वातावरणात गेली सात दिवस सुरू होता. या सात दिवसांमध्ये दररोज भजन व पहाटे पाच वाजता काकड आरती होत होती. या सप्ताहाची बुधवारी ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीची गावात पायी दिंडी व शोभायात्रा काढण्यात आली. पायी दिंडी व शोभायात्रा मुख्य बाजार रस्त्यावरुन अंबाबाई मंदीर मार्गे बस स्टॅड मार्गे पाटलाच्या ईनामातुन कुंभार गल्ली,शाळेच्या मैदान अशी परिक्रमा करून भजनी मंडळीच्या हरिनामाच्या गजरात ढोल ताशाच्या निनादात व फटाक्याच्या आतिषबाजीत संपूर्ण गावात

फिरून पायी दिंडी व शोभायात्रा परत शेवटी श्री काशी विश्र्वनाथ महाराज व संजीवन समाधी श्री घाळेप्पा स्वामी महाराज यांच्या पवित्र देवस्थान असणाऱ्या मंदिरात आली. पायी दिंडी व शोभायात्रा निघाली असता यात बालगोपालांसह टाळकरी महिला पुरुषांनी टाळमृदुंगाच्या आवाजावर फुगडीचा ठेका धरला. ज्ञानदेव तुकाराम च्या गजरात संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झाला होता. सात दिवस चाललेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची ह.भ.प. श्री नवनाथ महाराज डोंगरशेळकीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. व नंतर लगेच अन्नदाते केशव पाटील,सुर्यकांत पांचाळ व प्रा.शशिकांत बिचकुंदे यांच्या कडुन ठेवणण्यात आलेल्या महाप्रसादाला सुरुवात झाली. या महाप्रसादाचा लाभ अतनुर परिसरातील हजारो भाविक भक्तांनी घेतला. अशाप्रकारे गेल्या सात दिवसापासून सुरू असलेल्या सप्ताहाच्या सांगतेने शहर हरिनामाच्या गजरात, ढोलताशांच्या व फटाक्यांच्या अतिषबाजीने अक्षरक्षः दुमदुमले होते.

या सप्ताहचे वैशिष्ट म्हणजे मंदिरासाठी मंदिराशेजारीच खाजगी खुली जागा खरेदी करण्यात आली. त्यामुळे भक्ताकडुन पंचकमिटीचे कौतुक होत आहे.

या सप्ताह यशस्वितेसाठी कमिटी अध्यक्ष विकास सोमुसे,ऊपाध्यक्ष गोविंद पाटील येवरे,हभप दयानंद स्वामी,प्रकाश पोलीस पाटील,चंद्रकांत जोशी गुरुजी,नामदेव कोकणे,माधव सोमूसे,सुर्यकांत पांचाळ,किसन मुगदळे,नामदेव कोकणे,चंद्रकांत जोशी,खजिनदार बाबु पंचगल्ले गुरूजी,माणिक सांळुके.,दिलीप कोकणे,प्रमोद संगेवार,बाळु कोडगीरे,अशोक पाटील माजी सभापती कृषी ऊत्पन्न बाजार समिती,ऊदगीर,मारुती गुंडीले,श्रीधर पाटील गव्हाणे,श्रीमती मन्याबाई मधुकर पत्तेवार,पत्रकार संजय शिदे या सर्वानी सप्ताह यशस्वी पार पाडण्यासाठी गेली दोन महिने मोलाचे योगदान व सहकार्य केले . मंदिरावर पुजेची व्यवस्थापक म्हणुन बाबु कदम, बाबु साकोळकर,गुरुनाथ कापसे यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच अन्य काही मंडळीनी आपल्या दिलेली जबाबदारी चोख पार पाडली म्हणुन श्री काशी विश्र्वनाथल महाराज मंदिर संमिती तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# न्याय हक्कांच्या रक्षणासाठी नव्या क्रांतीची गरज : डॉ. आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आपल्या हक्कांसाठी आपल्यालाच संघर्ष करावा लागतो. दुसरा कोणीतरी आपल्याला न्याय मिळवून देईल, या भ्रमात राहू नका हा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला आहे. डॉ. बाबासाहेबांनी क्रांती करूनच आम्हाला हक्क मिळवून दिले आहेत. मात्र, आता आपले हक्क धोक्यात आले आहेत. डॉ. बाबासाहेबांना विरोध करणार्या विचारांच्या शक्तीपासून आपल्या हक्कांचे रक्षण करण्यासह संविधान वाचविण्यासाठी नव्या क्रांतीची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाने आता सज्ज रहावे, असे आवाहन भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीम राव आंबेडकर यांनी केले.






येथील बौध्द साहित्य मंडळ यांच्यातर्फे हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित एक दिवसीय बौध्द साहित्य संमेलनाच्या समारोप सोहळ्यात डॉ. आंबेडकर बोलत होते. याप्रसंगी संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे, स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, कोषाध्यक्ष किरण बनसोडे, समन्वयक डॉ. सुरेश कोरे, रिपाइं(ए) चे प्रदेशाध्यक्ष तथा माजी मंत्री राजाभाऊ सरवदे, माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे, भीमशक्ती संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष सुबोध वाघमोडे, बसपाचे प्रदेश महासचिव अॅड. संजीव सदाफुले, कामगार नेते जनार्दन शिंदे, माजी गटनेते आनंद चंदनशिवे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

या देशाच्या जडण-घडणीत बौध्दांचे, जैनांचे आणि मुस्लीम समाजाचे योगदान मोठे आहे. मात्र काही न केलेली मंडळी मात्र आम चे हक्क आणि योगदान नाकारत आ-हेत. गेल्या काही वर्षांपासून विशेषत: २०१४ पासून इतरांचा इतिहास दाबण्याचा प्रयत्न होत असल्याने अल्पसंख्याक समाज घटक भयभीत

## बौध्द साहित्य संमेलनात विविध सहा ठरावांना मंजुरी

झाल्याची खंत डॉ.आंबेडकर यांनी व्यक्त केली.

केवळ मंदिर आणि मशिदीचे राजकारण सुरू आहे. कालपरवाच्या संघटना आज सत्तेच्या केंद्रस्थानी आहेत. सरकारी नोकर्या नाहीत. दुसरीकडे शिक्षणाचे खाजगीकरण सुरू आहे. यातून आपले अस्तित्वच संपणार आहे. आपल्या पुढील पिढीसाठी, त्यांच्या न्याय हक्काच्या दुसर्या लढ्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन डॉ. आंबेडकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. युवराज भोसले यांनी केले.

सहा ठरावांना दिली मंजुरी

यावेळी विविध ठरावांचे वाचन कोषाध्यक्ष किरण बनसोडे यांनी केले. यामध्ये बिहार राज्यातील बुध्दगया येथील महाबोधी बुध्दविहार बौध्दांच्या ताब्यात द्यावे.

पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर शालेय स्तरावर इयत्ता पाचवीपा-सून पाली अभ्यासक्रम सुरु करावा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, येथे पाली भाषे-तून पीएच. डी. सुरु करावी. सर्व महाविद्यालयांमध्ये बी.ए. अभ्यासक्रमात पाली विषय सुरु करण्यात यावा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात एम. ए. मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विषय सुरू करावा. सर्व बुध्दविहारात ग्रंथालयास मान्यता देऊन अनुदान सुरू करावे. जातींचे वर्गीकरण करताना, आरक्षण ठरवताना महार आणि नव बौद्ध समाजाची एकत्र लोकसंख्या मोजून लोकसंखेच्या प्रमाणात आरक्षण देण्यात यावे आदी ठरावांना मंजुरी देण्यात आली. हात उंचावून सर्वांनी त्याला प्रतिसाद दिला.

सोलापूरच्या जयंतीचा सर्वांना अभिमान

सोलापूरमध्ये साजरी होणार्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सोहळ्याचा संपूर्ण देशातील आंबेडकरी जनतेला अभिमान आहे. सोलापूरची जयंती पाहून, बौध्दांचे संघटन पाहून समाधान आणि अभिमान वाटत असल्याचे डॉ. भीमराव आंबेडकर यांनी म्हणताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

## थोडक्यात...

### किरकोळ वादातून मारहाण, गुन्हा दाखल

सोलापूर : राहुल गांधी झोपडपट्टी येथे मागील भांडणाचा राग मनात धरून मारहाण केल्याची घटना शनिवारी (दि.१३) घडली. याप्रकरणी सुभाष सदाशिव चव्हाण (वय ५५ रा. घिसाडी गल्ली, राहुल गांधी झोपडपट्टी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून विकास सुरेश साळुंखे (रा. घिसाडी गल्ली) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.




यात अधिक माहिती, यातील फिर्यादीचा मुलगा कृष्णा हा शनिवारी घरासमोर थांबला होता. यावेळी संशयित आरोपी व फिर्यादीचा मुलगा कृष्णा याच्यात किरकोळ भांडण झाले होते. त्याच भांडणाचा रागातून संशयित आर-ोपीने फिर्यादीच्या डोक्यात विटेचा तुकडा मारून दुखापत केल्याचे फिर्यादीचे नमूद आहे.

### हँडल लॉक केलेली दुचाकी पळविली

सोलापूर : गाळा नंबर २५६ येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी (क्रमांक एम एच १३ डी ए ९५२२) ही चोरून नेल्याची घटना १६ एप्रिलला घडली. या प्रकरणी संभाजी रोहिदास कसबे (वय-४५,दत्त मंदिर) याने जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी पळविली

सोलापूर : न्यू बुधवार पेठ बॉबी चौक येथून हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी (क्रमांक एम एच १३ सी एल ४१६८) ही चोरून नेल्याची घटना २९ एप्रिलला घडली. याप्रकरणी अतीश रामचंद्र चौधरी (वय ३१ रा. न्यू बुधवार पेठ, बॉबी चौक) याने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### सासूने जावायला केली मारहाण

सोलापूर : गुरुनानक चौक येथे मागील भांडणाच्या रागातून सासूने जावायला मारहाण केल्याची घटना शनिवारी (दि.३) घडली. याप्रकरणी नितीन बाबू भोसले (वय-३०, रा. दामले वस्ती, मुळेगाव रोड) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्याच्या फिर्यादीवरून उषा समीर शिंदे, वैशाली बंडू पवार, बंडू पवार, पृथ्वीराज शिंदे (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, यातील संशयित आरोपीनी मागील झालेल्या भांडणाचा रागातून हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तेव्हा तेथे पडलेला दगड उचलून सासू उषा शिंदे यांनी फिर्यादीच्या डोक्यात मारून जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# नाम संकीर्तन सभागृहासाठी १५ कोटी निधीची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील एक सुंदर वास्तू असलेल्या पंढरपूर नाम संकीर्तन सभागृहाचे काम अंतिम टप्प्यात आले असून त्यासाठी पंधरा कोटी रुपये निधी मागणी आज

## मा.आ. प्रशांत परिचारकांनी घेतली मुख्यमंत्री यांची भेट

माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना भेटून केली आहे.

राज्यातील सर्वात मोठी तीर्थक्षेत्र असणाऱ्या पंढरपूर येथील विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम वर्षभर संपन्न होत असतात यासाठी येथील भव्य नाम संकीर्तन सभाग उभा करावी अशी मागणी प्रचंड परिचारक यांनी मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली होती याची दखल घेऊन सदर कामास मंजुरी देण्यात आली.



पंढरपूर शहरातील नाम संकीर्तन सभागृह बांधकामाच्या कामास ऑक्टोंबर २०१६ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून मंजुरी ऑक्टोबर २०१६ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून मंजुरी मिळाली होती सदर कामाची एकूण अंदाज पत्रकीय किंमत रुपये ३९.४७ कोठे होती आतापर्यंत २५ कोटी इतका निधी पंढरपूर नगरपरिषेक प्राप्त झालेला आहे प्राप्त झालेल्या निधीतून झालेल्या कामाची वेळ देण्यात आलेले आहेत सध्याच्या कामाच्या अंदाजपत्रकामध्ये वाढ झा-लेली प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील वॉल कंपाऊंड प्लंबिंग अग्निशमन व विद्युत इत्यादी काम ७० टक्के काम पूर्ण झा-लेले आहे तिसऱ्या टप्प्यातील नाम संकीर्तन सभागृहाचे अंतर्गत रस्ते भूखंड विकास फर्निचर व्यवस्था विद्युत व्यवस्था सीसीटीव्ही कॅमेरे इत्यादी कामे करण्याची असून यासाठी १५ कोहा कमर इत्यादी काम करण्याचे असून त्यासाठी पंधरा कोटी रुपये निधी मिळावा अशी मागणी प्रशांत परिचारक यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेऊन केली आहे.

याबाबत निवेदन त्यांना दिले हे सदर मागणी बाबत मुख्यमंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकर हा नेहमी मंजूर होईल.

# चि.सौ.कां रोशनी-चि.शिवराज यांचा शुभ विवाह सोहळा गुलबर्गा येथे थाटात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील वरिष्ठ पत्रकार आणि सुयश मीडिया ग्रुप चे ब्युरो चिफ आणि दैनिक प्रीतिसंगम चे सोलापूर जिल्हा प्रतिनिधी महेश गायकवाड यांच्या भाची व शहापूर जिल्हा गुलबर्गा येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुजाता चंद्रकांत धोडमनी यांच्या सुकन्या चि. सौ. कां. रोशनी यांचा शुभ विवाह विजापूर येथील शुगर फॅक्टरी चे केमिस्ट उमेश बिदरी यांचे सुपुत्र चि. शिवराज यांच्या सोबत गुलबर्गा येथील के इ बी मंडप फंक्शन हॉल येथे शुक्रवार दिनांक २ मे २५ रोजी असंख्य मान्यवरांच्या आणि महाराष्ट्रातील व कर्नाटकातील असंख्य नातेवाईक पाहुणे व मित्रपरिवार यांच्या उपस्थितीत मोठ्या थाटात आणि मोठ्या डाम डोलात पार पडला.

या लग्न सोहळ्यास रोशनी यांच्या आई सुजा-ता नवले धोडमनी यांच्या माहेर कडील असंख्य नातेवाईक प्रतिष्ठित मान्यवर मोठ्या संख्येने उप-स्थित होते. हा विवाह सोहळा उत्साहात साजरा



करण्यासाठी रोशनी हिचे काका मल्लिकार्जुन तसेच डॉक्टर असलेले लहान भाऊ डॉ राहुल तसेच नवरा मुलगा शिवराज यांचे वडील उमेश बिदरी, काका महेश बिदरी, शैलेश बिदरी, आत्या धानम्मा कटगेरी, डॉ अजय कटगेरी, आजोबा रमेश कोरी, विरपाक्ष हिरेमठ, हळळी , डॉ पिरापूर तसेच नवले कुटुंबीय धोडमणी कुटुंबीय आणि गायकवाड परिवार यांच्यासह अचलेर चे माजी सरपंच प्रकाश लोखंडे पटणे सावकार चंद्रकांत डावरे रमेश लोखंडे यांच्यासह पत्रकार गुरय्या स्वामी, गोपाळ माने, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# मंगळवेढ्याला दहा वर्षांनी मिळाली गटशिक्षणाधिकारी; नूतन गटशिक्षणाधिकारी दर्शन मेहता यांनी कार्यभार स्वीकारला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षापासून ग्रीक असलेल्या मंगळवेढा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी पदावरून दर्शन महा-वीर मेहता यांची नियुक्ती झाली आहे. त्यांनी २९ एप्रिल रोजी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला.




१० जुलै २०१६ पासून पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी पद रिक्त होते. त्यामुळे प्रभारी शिक्षणाधिकार्यावर येथील शिक्षणाचा गाडा चालत होता प्रभारी शिक्षणाधिकारी डॉक्टर बिभीषण रणदिवे यांच्याकडून मेहता यांनी पदभार स्वीकारल्यानंतर विविध शिक्षक संघटनांनी सत्कार केला.

मेहता हे सन २०२० मध्ये महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झाले तब्बल चार वर्षानंतर नियुक्ती आदेश पुणे विभागातून मिळाला आहे ते कॉम्प्युटर इंजिनिअर असून त्यासोबत निम्मी ची डिग्री त्यांनी प्राप्त केली आहे. सतरा वेळी शिक्षक नेते सुरेश पवार मरवडे केंद्रप्रमुख निवृत्ती सूर्यवंशी राज्य समन्वय दिगंबर इत्यादी जण उपस्थित होते.

# टाकळीवाडीचे प्रमोद बापूसो माने यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील डी.के.टी. ई. सोसायटीच्या पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील औद्योगिक प्रशिक्षण संस्थे मध्ये फिटर निदेशक या पदावर कार्यरत असलेले टाकळीवाडी गावचे प्रमोद बापुसो माने सर यांना नीती आयोग (भारत सरकार) संलग्न वसुंधरा सामाजिक सेवाभावी संस्था इचलकरंजी यांच्यामार्फत आदर्श शिक्षक म्हणून रत्नमाती स्टार राज्यस्तरीय गौरव पुरस्कार २०२५ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार डॉ. अशोकराव माने ( बापु ), कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. रविंद्र आरळी सर, गौरव अंकाचे प्रकाशक डॉ. श्रीमती निवेदिता माने ( वाहिनीसाहेब ) तसेच उपस्थित प्रमुख पाहुणे व नीती आयोग (भारत सरकार) संलग्न वसुंधरा सामाजिक सेवाभावी संस्थेचे संस्थापक विजय बचाराम तोडकर ( पत्रकार ) यांच्या उपस्थित पुरस्कार वितरण सोहळा व विशेषांक प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



'वेस्ट टू प्रोटोटाईप' व 'टेक्निकल आयडीया फॉर क्रिएटिव्ह ट्रीज' यावर स्पर्धा संपन्न

मान्यवरांची होती उपस्थिती

# स्वेरीमध्ये 'जागतिक सर्जनशीलता आणि नवोपक्रम दिन' उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर-'स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध संशोधन प्रकल्प निर्माण केले आहेत. विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ प्रकल्पांची निर्मिती केल्याचे दिसून आले. एकूणच विद्यार्थ्यांना चालना देण्यासाठी अशा स्पर्धात्मक व्यासपीठाची निर्मिती केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यवसाय निर्मिती व जागतिक बाजारपेठेचा दर्जा पाहून आपल्या प्रकल्पांवर अधिक लक्ष द्यावे' असे प्रतिपादन सरदार पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या डॉ. आरती करांडे यांनी केले.



गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर (ऑटोनॉमस) मध्ये दि.२१ एप्रिल २०२५ रोजी 'वर्ल्ड क्रिएटीव्हीटी अँड इनोव्हेशन डे २०२५' हा उपक्रम इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल (आयआयसी) अंतर्गत उत्साह साजरा करण्यात आला. या निमित्ताने 'वेस्ट टू प्रोटोटाईप' व 'टेक्निकल आयडीयाज् फॉर क्रिएटिव्ह ट्रीज' या दोन वेगवेगळ्या स्पर्धा भरविण्यात आल्या होत्या. याप्रसंगी डॉ. आरती करांडे ह्या मार्गदर्शन करत होत्या. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, आय.आय सी. प्रेसिडेंट डॉ.दिग्विजय रोंगे व विभागप्रमुख डॉ. सुमंत आनंद यांच्या नेतृत्वाखाली इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग, इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल (आयआयसी) आणि इन्स्टिट्यूशन्स ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इलेक्ट्रिकल (आयईईई) यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सरदार पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या डॉ. आरती करांडे या उपस्थित होत्या. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर डॉ. करांडे यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या वर्षीच्या कार्यक्रमाची संकल्पना ही 'वेस्ट टू प्रोटोटाईप' आणि 'टेक्निकल आयडीया फॉर क्रिएटिव्ह ट्रीज' या बाबींवर आधारित होती. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी पुनर्वापर, पुनरुत्पादन व पुनर्निर्मित साहित्यांचा वापर करून नावीन्यपूर्ण नमुने (मॉडेल्स) सादर केले. या संकल्पनांद्वारे विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची दिशा मिळाली. डॉ.आरती करांडे यांनी मार्गदर्शन करताना 'सर्जनशीलता आणि नवोपक्रमाचा प्रत्यक्ष आयुष्यात कसा उपयोग होतो' हे अत्यंत समर्पक उदाहरणांद्वारे सांगितले. त्यांनी चित्रपट, व्यवसाय आणि रोजच्या अनुभवांद्वारे नवकल्पनांचा विकास कसा होतो हे देखील स्पष्ट केले. प्रस्तावना व परीक्षण यानंतर प्रदर्शनाला सुरुवात झाली. विविध विभागांतील विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पांतून विविध कल्पना सादर केल्या. परीक्षकांनी नाविन्यता, तांत्रिक बाजू व शाश्वततेच्या आधारे या प्रकल्पांचे परीक्षण केले. त्यांनतर बक्षीस वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये प्रथम क्रमांक: श्रीराम कृष्णनाथ पतंगे, नेहा उद्धवराव सोमवंशी व सरस्वती शिंदे तर द्वितीय क्रमांक- वैकुंठी शिवराज जाधव, सुहानी संजय शिंदे, मयुरी रविंद्र माने व अमृता शरद गायकवाड यांनी मिळविला. कार्यक्रमाचे समन्वक म्हणून प्रा. स्मिता गावडे यांनी काम पाहिले. यावेळी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, प्रा. प्राजक्ता तुपारे यांच्यासह इतर प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन जय गाडेकर यांनी केले तर आभार डॉ. यशपाल खेडकर यांनी मानले.

## थोडक्यात...

### प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते ध्वजारोहण

पंढरपूर : महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते सकाळी ८.०० वाजता ध्वजारोहण करण्यात आले. तहसिल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या ध्वजारोहण सोहळयास तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, नायब तहसिलदार बालाजी पुदलवाड, विजय जाधव, वैभव बुचके, यावेळी राष्ट्रगीत व राज्य गीत गायन झाले. तसेच पोलीस पथकाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी स्वांतत्र्यसैनिक, शासकीय अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी व नागरीक उपस्थित होते.

### पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सोलापूर जिल्हा दौरा

सोलापूर (जिमाका):- सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे मंगळवार दि. ६ मे २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे. दि. ६ मे २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता चौंडी येथून बार्शी, जि.सोलापूरकडे प्रयाण, सायंकाळी ५.०० वाजता शासकीय विश्राम गृह, बार्शी येथे आगमन व राखीव, सायंकाळी ६.०० वाजता शिवाजी प्रसारक मंडळ, (ट्रामा युनिट) बार्शी येथे सदिच्छा भेट, सायंकाळी ६.२० वाजता बार्शी येथून कांदलगाव, ता.बार्शीकडे प्रयाण, सायंकाळी ६.३० वाजता कांदलगाव येथे आगमन व मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत रस्ते विकास कामाच्या शुभारंभास उपस्थिती, सायंकाळी ६.५० वाजता कांदलगाव येथून बार्शीकडे प्रयाण, सायंकाळी ७.०० वाजता बार्शी येथे आगमन व भक्तनिवास भूमिपूजन समारंभास उपस्थिती, रात्री ८.०० वाजता भगवंत महोत्सवास उपस्थिती, रात्री ९.०० वाजता शासकीय विश्रामगृह, बार्शी येथे राखीव, रात्री १०.१५ वाजता बार्शी येथून कुर्डूवाडी, जि.सोलापूरकडे प्रयाण, रात्री ११.०० वाजता कुर्डूवाडी रेल्वे जंक्शन येथे आगमन व राखीव, रात्री ११.३० वाजता सिध्देश्वर एक्सप्रेस रेल्वेने मुंबईकडे प्रयाण करतील.

# क.ग.दा. मोरे निफाड महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे एच.एस.सी. परीक्षेत घवघवीत यश

## १२ वी परीक्षेचा निकाल मंगळवार ५ मे २०२५ रोजी ऑनलाईन जाहीर, विद्यार्थ्यांचा जल्लोष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षेचा निकाल मंगळवार दि. ०५ मे २०२५ रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला. त्यात मविप्र समाज संस्थेच्या कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

विज्ञान शाखेचे १८८ पैकी १८८ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला, वाणिज्य शाखेचे ९० पैकी ९० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला तर कला शाखेचे १७७ पैकी १७१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९६.६१% निकाल लागला,





यात अनुक्रमे विज्ञान विभागात कापसे कृष्णा (८८.१७%), शिंदे प्रेरणा (८५.३३%), जाधव कावेरी (८४.३३%) वाणिज्य विभागात शेख जिशान (८७%), काहाने कल्याणी (८३.३३%), साळवे साक्षी (७८.५०%) कला विभागात गवळे शालिनी (८७.८३%), मौर्य प्रीया (८१%), सोनवणे रोहित (७५.३३%) हे विद्यार्थी प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

या यशाबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, सरचिटणीस ड. नितीनजी ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख, महिला संचालक श्रीमती शोभाताई बोरस्ते, मविप्र शिक्षणाधिकारी प्रा डॉ. नितीन जाधव, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष डॉ. उत्तम डेरले, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. अभय वडघुले, प्रा. सुनील जाधव, प्रा. प्रकाश आहेर, प्रा. प्रवीण शेलार, प्रा. राजेंद्र जाधव, श्रीमती सविता कापसे, आदीसह सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

कॉमर्स पहिले तीन

१. शेख जिशान २. कहाणे कल्याणी ३. साळवे साक्षी

# कर्मवीर महाविद्यालयाचे बारावी बोर्ड परीक्षेत उज्ज्वल यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : येथील रयत शिक्षण संस्थेच्या, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचा एच.एस.सी. बोर्ड परीक्षेचा ऑनलाईन निकाल नुकताच जाहीर झाला आहे. महाविद्यालयाचा एकूण एकूण शेकडा निकाल ९०.३३ लागला आहे. विद्याशाखानिहाय शेकडा निकाल व पहिले तीन क्रमांक खालील प्रमाणे.

विज्ञान शे. निकाल ९७.०३, प्रथम क्रमांक - चि. बचुटे मयंक मधुसुदन (८९.१७), व्दितीय क्रमांक - चि. वसेकर अर्थव संतोष (८३.००), तृतीय क्रमांक - चि. सप्तश्व गंधर्व महेश (८२.६७),

वाणिज्य शे. निकाल ९४.७४, प्रथम क्रमांक -कु.राठी वृंदा मनोजकुमार (९२.५०), व्दितीय क्रमांक - चि. लोलगे वरद प्रमोद (९२.३३), तृतीय क्रमांक - चि. कोकीळ ऋत्वीक वैभव (९१.५०), कला - शे. निकाल ७२.८६

प्रथम क्रमांक - चि.रानडे देवदत्त सुधीर(८६.८३), व्दितीय क्रमांक - कु. सय्यद हुमेरा जावेद (८२.३३), तृतीय क्रमांक - कु. बोबडे प्राजक्ता महादेव (७९.५०)

एच. एस. व्ही .सी. शे. निकाल ८७.८८

प्रथम क्रमांक - चि. जाधव कन्हैया रमेश (ET) (६२.३३)

प्रथम क्रमांक - कु. माने स्वराली संतोष (MRM) (७६,००)

प्रथम क्रमांक - कु. शिंदे प्रगती गणेश (AOM) (७५.८३)

पुस्तपालन व लेखाकर्म या विषयात १०० पैकी १०० गुण घेणारे विद्यार्थी -

१) कु.राठी वृंदा मनोजकुमार १००/१००
२) चि. सावजी प्रथमेश प्रकाश

यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य. डॉ. समाधान माने व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विठ्ठल काटकर व सर्व मार्गदर्शक शिक्षकांनी हार्दिक अभिनंदन केले व पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# कांदा निर्यातबंदी आंदोलन प्रकरणात माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांच्यासह आठ आंदोलकांची निर्दोष मुक्तता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/निफाड : केंद्र सरकारने २०२० साली घेतलेल्या कांदा निर्यातबंदीच्या निर्णयाच्या विरोधात राज्यभर शेतकरी असंतोषाने पेटून उठले होते. याच पार्श्वभूमीवर रयत क्रांती संघटनेचे संस्थापक व माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी इतर शेतकरी कार्यकर्त्यांसह विंचूर बाजार समिती परिसरात आंदोलन केले होते. या आंदोलनादरम्यान झालेल्या गोंधळामुळे लासलगाव पोलीस ठाण्यात सदाभाऊ खोत व इतर आठ आंदोलकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यानंतर पाच वर्षांनी, निफाड न्यायालयाने दिनांक ५ एप्रिल २०२५ रोजी या प्रकरणाचा निकाल दिला. न्या. स्नेहा देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालील न्यायालयाने सदाभाऊ खोत यांच्यासह आठही आंदोलकांची निर्दोष मुक्तता केली आहे. या खटल्यात एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले, मात्र त्यांच्या साक्षांमधून आंदोलकांकडून कोणतेही बेकायदेशीर कृत्य झाल्याचे ठोस पुरावे सादर होऊ शकले नाहीत. वकील विनोद गुंजाळ व नरेंद्र आहेर यांनी बचाव पक्षाचे कामकाज समर्थपणे हाताळले. त्यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना आंदोलन हा शेतकऱ्यांचा लोकशाही अधिकार असून, तो शांततेच्या मार्गाने पार पडल्याचे अधोरेखित केले.

# रमझान शेख यांच्या राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या जनसेवा कार्यालयाचे भव्य उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तसेच विधिमंडळ गटनेते आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते तसेच ठाणे जिल्हा अध्यक्ष सुहास देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव रमझान शेख यांच्या खारघर येथील पक्ष कार्यालयाचा उद्घाटन सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला.



जितेंद्र आव्हाड यांच्या अविस्मरणीय उपस्थितीमुळे या नव्या कार्यालयाद्वारे पक्षाचे संघटन अधिक मजबूत होईल आणि जनतेपर्यंत थेट पोहोचता येईल. तसेच या कार्यालयाच्या माध्यमातून स्थानिक जनतेच्या अडचणी ऐकून घेणे, पक्षाची ध्येयधोरणे पोहोचवणे व युवकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हे प्रमुख उद्दिष्ट राहील, असे रमझान शेख यांनी सांगितले.

याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस राजेश कदम,ठाणे जिल्हा प्रशासन सरचिटणीस राजेश साटम, ठाणे शहर सचिव सुनिल कुऱ्हाडे, शीळ विभाग अध्यक्ष गणेश मुंडे, खारघर शहराध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे ,खारघर शहर सरचिटणीस मंथन कांबळे, इकबाल शेख यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सैनिक टाकळीतील छत्रपती शिवाजी हायस्कूल माजी विद्यार्थ्यांचा ३२ वर्षानंतर गेट-टुगेदर कार्यक्रमाद्वारे जुन्या आठवणींना उजाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी प्रतिनिधी/ संजय चव्हाण : सैनिक टाकळी येथील छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या १९९३ -९४बॅचच्या मुला मुलींचा गेट-टुगेदर कार्यक्रम रविवारी इंचलकरंजी येथे पार पडला

शालेय जीवनातील जुन्या आठवणींना ताज्या करण्यासाठी तसेच संसार, नोकरी, मुलेबाळे या सर्वातून आपल्या जुन्या मित्र-मैत्रिणींच्या सोबत थोडा वेळ घालवण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता. हा कार्यक्रम इचलकरंजी येथे पार पडला

या कार्यक्रमासाठी त्या शाळेचे माजी शिक्षक, माजी विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते कार्यक्रमाचे रूपरेषा अशी होती ही सकाळी दहा वाजता हॉटेल कॅब्रसणं मध्ये हे सर्व




विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षक जमा झाले

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आर. डी पाटील सर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री दिलीप शेळके सर उपस्थित होते पहिल्यांदा कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्ताविक विद्यार्थ्यांच्या द्वारे करण्यात आले त्यानंतर अल्पोपहार ,दुपारी जेवण, फनी गेम्स, व मनोरंजनात्मक कार्यक्रम करण्यात आले . सर्वांनी आपापल्या विषयी माहिती दिली. या विद्यार्थ्यांनी त्यांच्या सर्व माजी शिक्षकांना बोलावून त्यांचा आदरसत्कार केला.

आजकालच्या धावपळीच्या जीवनामध्ये प्रत्येक जण आपापल्या कामांमध्ये व्यस्त असताना देखील या विद्यार्थ्यांनी कुठेतरी जुन्या गोष्टीना या कार्यक्रमाद्वारे उजाळा मिळाला.

विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम पार पडल्यानंतर आपल्या शिक्षकांकडून भावी जीवनाच्या वाटचालीसाठी आशीर्वाद घेतले व संध्याकाळी हा कार्यक्रम समाप्त झाला ..

शेवटी जाता जाता या सर्वांनी आपली मैत्री आयुष्यभर टिकावी यासाठी कॉन्टॅक्टमध्ये राहण्याचे व एकमेकांना मदत करण्याचे आश्वासन एकमेकांना देऊन कार्यक्रम समाप्त झाला..

# स्वेरीच्या विद्यार्थ्यांचे 'डिपेक्स २०२५' मध्ये यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आणि कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या दोन विभागांमधील गणेश नवनाथ सुरवसे, मोहिनी हणमंत खटकाळे, राजनंदिनी भाऊराव इंगळे, कृष्णा दिनेश मोरे आणि तेजस रवींद्र वायदंडे यांना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (सीओईपी) टेक्नॉलॉजिकल यूनिवर्सिटी, पुणे येथे घेतलेल्या 'डिपेक्स २०२५' या राज्यस्तरीय प्रोजेक्ट कॉम्पिटिशनमध्ये मोबीलीटी या प्रवर्गात 'टेस्ट बेंच फॉर मल्टी रोटर ड्रोन' या प्रकल्पासाठी प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे.




महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेले हे एक महत्त्वाचे राज्यस्तरीय प्रदर्शन होते. या उपक्रमाचे आयोजन दरवर्षी विविध शैक्षणिक संस्थांमध्ये केले जाते. त्यामध्ये नवीन प्रकल्पांचे सादरीकरण केले जाते. गेल्या महिन्यात झालेले राज्यस्तरीय प्रदर्शन हे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे,अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सृजनन्यास, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ पुणे आणि महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण मंडळ (एमएसबीटीई) यांनी आयोजित केले होते. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये दोन हजारांहून अधिक प्रकल्पांची नोंदणी झाली होती.

या उपक्रमांतर्गत ३५० हून अधिक मॉडेल्सचे प्रदर्शन करण्यात आले तर सुमारे ५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी या परिषदेमध्ये सहभाग घेतला होता. 'डिपेक्स २०२५' या राष्ट्रीय परिषदेमध्ये एकूण ११ प्रकारांमध्ये प्रकल्प सादर करण्यात आले होते. डिपेक्स या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्यातील नाविन्यतेची, संशोधनाची आणि तांत्रिक कौशल्यांची क्षमता वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे दिसून येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यासाठी एक व्यासपीठ मिळते. ज्यामुळे त्यांच्या करिअरच्या विकासास मदत होते. या प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या आर. जी. एस. टी. सी. ड्रोन प्रकल्प व ड्रोन टिम, तसेच शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.एम. पी. ठाकरे व प्रा.एस. एस. कवडे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी अंतर्गत असलेल्या चारही महाविद्यालयांचे प्राचार्य, कॅम्पस इनचार्ज डॉ. एम. एम. पवार, डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इलेक्ट्रिकल व कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## पडघा आठवडा बाजारात रस्त्यावरच पार्किंग

## अपघात झाल्यास जबाबदार कोण?

# पडघा येथील महामार्गावरील धोकादायक आठवडा बाजार बंद करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील पडघा आठवडा बाजारात मोठया प्रमाणात नागरिकांची गर्दी होत असून नाशिक महामार्गाच्या कडेलाच हा आठवडा बाजार भरत असून ,खरेदी करण्यासाठी आलेले नागरिक रस्त्यावरच पार्किंग करत आहेत. याचे गांभीर्य लक्षात घेत पडघा ग्रामपंचायत हद्दीतील मुंबई नाशिक महामार्गा लगत भरणारा आठवडा बाजार बंद करण्याची मागणी वाहुली गाव विकास प्रतिष्ठान समाजसेवी संस्थेने लेखी निवेदनाद्वारे पडघा ग्रामपंचायतीला केली आहे.



पडघा ग्रामपंचायत हद्दीत शेरेकर, चिबींपाडा कडे जाणाऱ्या गावाच्या बाजुकडील मुंबई नाशिक महामार्गालगत सध्या रविवारी मोठा आठवडा बाजार भरत असुन या ठीकाणी बाजार करण्यासाठी गृहोपयोगी सामान, भाजीपाला, कांदे विक्रीसाठी आलेले दुकानदार मोठ्या प्रमाणावर गर्दी करीत आहेत. ही गर्दी धोकेदायक असुन महामार्गावरील भरधाव वाहनाचा ताबा सुटल्यास गर्दीत वाहन घुसुन मोठा अपघात घडण्याची शक्यता असल्याची बाब वाहुली गाव विकास प्रतिष्ठान( रजि.) या समाजसेवी संस्थेच्या लक्षात येताच संस्थेचे अध्यक्ष सुरेश शिंदे, सहसचिव गणेश मते यांनी सदर बाजार बंद करण्याची मागणी सरपंच ग्रामपंचायत पडघा, तहसीलदार भिवंडी, पोलीस निरीक्षक पडघा पोलीस ठाणे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करून आठवडे बाजारातील विक्रेत्यांना पर्यायी व्यवस्था करून देण्याची मागणी केली आहे.

या मागणीला पर्याय निघेल का? याकडे वाहुली गाव विकास प्रतिष्ठान समाजसेवी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे तसेच पडघे परिसरातील नागरिकांचे याकडे लक्ष वेधले आहे.